पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद.

# अर्थशास्त्र विभाग अहवाल

२०१८-२०१९

# * अनुक्रमणिका *


१) अतिथी व्याख्यानांचे आयोजन

२) पंडित दीनदयाळ जयंती

३) प्रकल्प भेट

४) भित्तीपत्रके

५) गटचर्चा

६) सामंजस्य करारांतर्गत सर्व्हेक्षण

७) शेतमाल हमीभाव जागरुकतेबाबत सर्व्हेक्षण

८) अर्थसंकल्पाचे प्रक्षेपण

९) फोटो अहवाल

१०)सर्व्हेक्षण नमुना

११)फोटो अहवाल

१२)प्रसिध्दी

# -: अतिथी व्याख्यानांचे आयोजन :-

**कृषी, उद्योग व सेवाक्षेत्राची आर्थिक विकासातील भूमिका :-**

दिनांक १० ऑगस्ट २०१८ रोजी विभागाच्या वतीने "कृषी, उद्योग व सेवाक्षेत्राची आर्थिक विकासातील भूमिका" या विषयावर प्रा.नारायण गेडाम (विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड) यांच्या अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**अर्थशास्त्र विषयात विदेशी शिक्षणाच्या संधी :-**

द्वितीय सत्रात दिनांक ७ जानेवारी २०१९ रोजी विभागाच्या वतीने Anglia Ruskin University, Cambridge, London या विद्यापीठातील Business Economics या विषयाचा बी.एस्सी. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी श्री समर्थ संजय पाटील यांचे "अर्थशास्त्र विषयातील विदेशी शिक्षणाच्या संधी" या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी स्वत: विदेशात शिक्षण घेण्यासाठी दिलेल्या स्पर्धा परीक्षांची माहिती दिली. विदेशात गेल्यानंतर तेथील शिक्षण पध्दती विषयी बोलतांना विविध देशातून आलेल्या विद्यार्थ्यांचे एकत्रीकरण करण्यासाठी त्या विद्यापीठात गेम्स घेतले. त्या देशाविषयी माहिती व्हावी म्हणून देशाविषयी प्रोजेक्ट घेतले जातात. जसे सध्याचा ब्रेक्झीटचा प्रश्न. त्यांना त्या विषयाची पार्श्वभूमी सांगण्यात आली. विद्यार्थ्यांना शिकविलेल्या बाबी संदर्भात वारंवार पुढे जाऊन सादरीकरण करावे लागते. आठवड्यातून तीन दिवस तास असतात. वर्षातून ९०% उपस्थिती अपरिहार्य आहे. शिक्षक शिकवत असतांना सादरीकरणावर भर देतात. त्यामध्ये विषयाला अनुसरुन अलीकडील काळातील उदाहरणे दिली / दाखविली जातात. जेणेकरुन विद्यार्थ्यांची रुची जागृत होईल. विद्यार्थी शिक्षकाला रात्रीही ईमेल करु शकतो. आदल्या दिवशी तासाला काय झाले? याचा वृत्तांत ऐकून त्यादिवशी न आलेले विद्यार्थी दुसऱ्या दिवशी तासाला बसतात. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहारात जाऊन आकडेवारी, प्रक्रिया, विश्लेषण, बॅकींगमध्ये जाऊन काम करावे लागते.

विदेशात शिक्षण घेत असतांना शिक्षण घेता घेता काम करुन कमविता येते. मी स्वत: चहा किंवा कॉफीच्या दुकानात काम करतो असे त्यांनी सांगितले.

पंडित दीनदयाळ यांचे जीवन व विचार या संदर्भात बोलतांना डॉ.सतीष कराड म्हणाले की, पंडितजींचा एकात्म मानवतावाद पाश्चिमात्य विचारावर आधारीत नसून भारतीय विचार परंपरेवर आधारित आहे. भारतीय विचार संपूर्ण मानवजातीच्या सर्वांगिण हिताचा विचार करणारे असल्याचे मत त्यांनी मांडले. प्रस्थापित राजकीय व्यवस्थेला पर्यायी व्यवस्था विकसित करण्यासाठी भारतीय जनसंघाच्या पायाभरणीत पंडित दीनदयाळ यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. त्यांना पक्षाच्या अध्यक्ष पदापेक्षा पक्ष विकासासाठी कार्यकर्ता म्हणून काम करण्यात अधिक रस असल्याचे मत डॉ.सतीष कराड यांनी मांडले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना श्री.ज्ञानेश्वर थोरे यांनी असे मत व्यक्त केले की, पंडित दीनदयाळ यांचे विचार शाश्वत विकासावर भर देणारे आहेत. त्यांच्या मते सृष्टीचे शोषण नाही तर दोहण झाले पाहिजे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.ज्योती उदयेने, पाहुण्यांचा परिचय कु.सीमा जाधवने, सुविचार कु.बोलकर दिपाली हिने तर आभार प्रा.बाबासाहेब लहाने यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ.संजय पांचाळ, डॉ.गणेश कुलकर्णी, सौ.दांडगे मॅडम, श्री.गजानन हरकळ, श्री.राजू खरात यांनी सहकार्य केले.

## -: प्रकल्प भेट : नुजिविडू सिडस् लिमीटेड :-

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातील विविध उद्योगांची ओळख व्हावी या अनुषंगाने दि. २३ जानेवारी २०१९ रोजी औरंगाबाद - फुलंब्री रोडवरील नायगांव या गावाच्या हद्दीत असलेल्या नुजिविडू सिड्स लिमीटेड या कापूस बीज उत्पादक कंपनीस भेट देण्यात आली. या कंपनीतील विविध विभागाची माहिती कंपनीचे विभागीय उपव्यवस्थापक श्री.के.व्ही.नागराज यांनी करुन दिली. तसेच संगणकाद्वारे मशिन ऑपरेटींग या विभागाची ओळख ए.व्ही.नारायण यांनी करुन दिली. त्यात कापसाच्या बीचे लिटींग कसे होते हे विद्यार्थ्यांना समजले. त्यानंतर बीजाचे पॅकिंग कसे होते हे दाखविण्यात आले. बियांची उगवण क्षमता तपासण्यासाठी पेपर तंत्रज्ञानाचा वापर करुन लॅबमध्ये होत असलेली तपासणी

सौ.संगीता रघू यांनी करुन दिली. उत्पादनाचे पॅकिंगनंतर शितगृहात कशी साठवण केली जाते याची माहिती श्री.दिनेश पोलारे यांनी करुन दिली.

त्यानंतर कंपनीतर्फे विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला व बॅग भेट देण्यात आली.

## -: भित्तीपत्रके :-

विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये दोन भितीपत्रकांचे विमोचन करण्यात आले. त्यात दिनांक १०/१०/२०१८ रोजी "किमान आधारभूत किंमत" भित्तीपत्रक प्रकाशित करण्यात आले. तर दिनांक १२/०२/२०१९ रोजी "केंद्रीय अंतरिम अर्थसंकल्प २०१९-२०" या विषयावर भित्तीपत्रक प्रकाशित करण्यात आले.

## -: गटचर्चा :-

विभागाच्या वतीने या शैक्षणिक वर्षात चालू आर्थिक विषयावर गटचर्चांचे आयोजन करण्यात आले. त्यात 'शेतमालाला हमीभावाची गरज आहे काय?', 'अंतरिम केंद्रीय अर्थसंकल्प २०१९-२०' व 'महाराष्ट्राचा अर्थसंकल्प २०१९-२०' या विषयांचा समावेश आहे.

## -: सामंजस्य करारांतर्गत सर्व्हेक्षण :-

विभागाच्या वतीने सामंजस्य करारांतर्गत काही उपक्रम राबविण्यात आले. स्वामी रामानंद तीर्थ संशोधन केंद्र, औरंगाबाद यांच्याशी झालेल्या सामंजस्य करारांतर्गत फुलंब्री तालुक्यातील पाझर तलावांच्या स्थिती संदर्भात सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात २५ गावातील पाझर तलावांच्या स्थिती संदर्भात प्रत्यक्ष पाझर तलावास भेट देऊन व त्या पाझर तलावांच्या शेजारी असलेल्या शेतकऱ्यांशी चर्चा करुन अनूसुची भरण्यात आल्या.

या सर्वेक्षणात श्री.योगेश लक्ष्मण नरवडे, श्री.अशोक अर्जुनराव चव्हाण, श्री.संघरत्न शिवाजी गवई या पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या सर्वेक्षणाचे समन्वय

डॉ.पांडुरंग कल्याणकर यांनी केले. तर यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे काम डॉ.पी.एस.कुलकर्णी यांनी करुन दिले.

तसेच दिनांक २०-२१ डिसेंबर २०१८ या कालावधीत जळगांव येथे झालेल्या 'भूगर्भातील पाणी साठवण व चिरस्थायी विकास' या विषयावर झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात डॉ.पी.एम.कल्याणकर यांनी सहभाग घेतला.

## -: शेतमाल हमीभाव जागरुकतेसंदर्भात सर्वेक्षण / पाहणी :-

सन २०१८ या वर्षात शेतमाल हमीभाव संदर्भात अधिक चर्चा होत असल्याने अर्थशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये "शेतमाल किमान आधारभूत किंमतीबाबत शेतकऱ्यांची जागरुकता व वस्तूस्थिती" या विषयावर सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला. यामध्ये अनूसुचीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे मत जाणून घेण्यात आले. एकूण .... शेतकऱ्यांची माहिती घेण्यात आली. या सर्वेक्षणातून महाविद्यालयातील ........ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## -: महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्पाचे प्रक्षेपण :-

दि. २७ फेब्रुवारी २०१९ रोजी महाराष्ट्र राज्याचा २०१९-२० साठीचा अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पाचे अर्थशास्त्र विभागात प्रोजेक्टर प्रक्षेपण करण्यात आले. तसेच डॉ.कल्याणकर पी.एम. यांनी अर्थसंकल्पातील विविध घटकांचे विद्यार्थ्यांना स्पष्टीकरण दिले.

**डॉ.पी.एम.कल्याणकर**
सहयोगी प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग

**डॉ.एस.आर.टकले**
प्राचार्य व विभागप्रमुख

**अर्थशास्त्र विभाग**
**फोटो अहवाल**
**२०१८-१९**



अर्थशास्त्र विभागात १० ऑगस्ट २०१८ रोजी अतिथी व्याख्यान देतांना प्रा. नारायण गेडाम



अतिथी व्याख्यानास लाभलेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद




अर्थशास्त्र विषयातील विदेशी शिक्षणाच्या संधी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. कल्याणकर पी. एम.



दि. ७ जानेवारी २०१९ रोजी अर्थशास्त्र विषयातील बिदेशी शिक्षणाच्या संधी या विषयावर
मार्गदर्शन करतांना श्री. समर्थ पाटील




दि. ७ जानेवारी २०१९ रोजी अर्थशास्त्र विषयातील विदेशी शिक्षणाच्या संधी या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री. समर्थ पाटील



कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले







पंडित दीनदयाळ जयंती कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना प्रा. सतीष कराड



प्रकल्प भेटीत नुजिविड सिडस लिमिटेड ची माहिती देतांना उपव्यवस्थापक, श्री. के. व्ही. नागराज





प्रकल्प भेटीत सहभागी विद्यार्थी



नुजिवीडू सिड्स लिमिटेड तयार करीत असलेल्या विविध पॅक बियाणांची माहिती घेतांना विद्यार्थी



बियाणांची उगवण क्षमता तपासण्यासाठी नुजिवीडू सिड्स लिमिटेड वापरात आणत असलेले
पेपर तंत्रज्ञान समजावून घेतांना विद्यार्थी





कंपनीतील गोदाम बघतांना विद्यार्थी




प्रकल्प भेटीत सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक



व्यापारचक्र या विषयावर सेमिनार देतांना कु. शितल जाधव



महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्प २०१९-२० प्रोजेक्टरच्या साहाय्याने दाखवतांना डॉ. कल्याणकर पी. एम.



# Economics Department

## Publicity 2018-2019

# पं. दीनदयाळ यांनी देशासाठी आयुष्य वेचले -डॉ. कराड

दै. पुण्यनगरी. 28.09.2018

**फुलंब्री/प्रतिनिधी**

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी भारताची सर्वांगीण प्रगती व्हावी याकरिता आपले संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांचा आदर्श घेऊन आपण सर्वांनी भारताची एक वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, असे मत डॉ. सतीश कराड यांनी व्यक्त केले.

फुलंब्री येथील संत सावता माळी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. कराड यांनी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय : जीवन आणि विचार' या विषयावर मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले. अध्यक्षस्थानी संत सावता गुरुकुलचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर थोरे उपस्थित होते. पुढे डॉ. कराड म्हणाले की, पंडित दीनदयाळ यांनी नवभारत निर्मितीचे स्वप्न पाहिले.

प्रामाणिकपणे मेहनत करणे हा खरा यशाचा मार्ग आहे, असे ते नेहमी म्हणत. सर्वसामान्य व्यक्तीत रममान होणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ख्याती होती. राष्ट्रीय जनसंघाची उभारणी त्यांनी केली असल्याचेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप ज्ञानेश्वर थोरे यांनी केला. प्रा. बाबासाहेब लहाने यांनी उपस्थितांचे आभार मानले. ज्योती उदे हिने सूत्रसंचालन केले.

---

म.टा. 26.09.2018

# उपाध्याय जयंती साजरी

**फुलंब्री :** येथील श्री संत सावतामाळी महाविद्यालयांतील अर्थशास्त्र विभागातर्फे सोमवारी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. सतीश कराड यांनी उपाध्याय यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर थोरे होते. सूत्रसंचलन ज्योती उदे यांनी केले, तर प्रा. बाबासाहेब लहाने यांनी आभार मानले.